**प्रतिवादी क्र. ३ व ४ तर्फे उर्वरित उलटतपास श्री. एस. आर. पोवार वकील यांचे मार्फत.**

**१९.** मी शंकर बापू देसाई यांना ओळखत होतो. मला त्याने या दाव्यातील प्रतिवादींच्या विरोधात नियमित दिवाणी दावा ९२/२०१० दाखल केल्याची माहिती नाही. गट क्र. ३१५ व ३१६ चे सर्वे क्र. अनुक्रमे १३७/१ व १३७/२ आहेत. मी सर्वे क्र. १३७/१ व १३७/२ चे जुने सातबारा उतारे दाव्यात दाखल केलेले आहेत. शंकर बापू देसाई कोणत्या गावात मयत झाला याची माहिती नाही. तो नरेवाडी, ता. गडहिंग्लज येथे राहत होता.

**२०.** पुर्वी सर्वे क्र. १३७/१ ची जमीन दत्तात्रय शंकर लुकतुके व त्यांच्या नंतर नरहर विष्णू जोशी यांच्या मालकीची होती. आता मला त्याबाबतचा सन १९५३-१९५४ ते १९६२-१९६३ अखेर पर्यंतच्या मी दाखल केलेला सातबारा उतारा दाखविला, तो मला मान्य आहे, त्याला **नि. क्र. ११५** देण्यात येतो. त्या उता-या मध्ये सन १९५३-१९५४ पासून १९६२-१९६३ पर्यंत सदर मिळकती कूळ व खंडकोष्टकात कृष्णा नागोजी मयेकर व आण्णा नागोजी मयेकर यांच्या नावे झालेल्या आहेत. त्याप्रमाणे कृष्णा व आण्णा यांच्या नावे प्रत्येकी १/४ जमिनीची सातबाराच्या इतर हक्कात संरक्षित कूळे म्हणून नोंद झाली आहे.

**२१.** आज रोजी गट क्र. ३१५ च्या मालकी हक्कामध्ये आण्णा व कृष्णा मयेकर यांचे वारस व बाबासाहेब देसाई यांची नावे आहेत. गट क्र. ३१६ च्या मालकी हक्कामध्ये बाबासाहेब देसाई यांच्या वारसांची नावे आहेत. मयेकरांची नावे गट क्र. ३१५ च्या मिळकतीला कूळ म्हणून नोंदविल्यानंतर तशीच राहिलेली आहेत. गट क्र. ३१६ च्या ०.७८.८ आर क्षेत्रास कृष्णा व आण्णा मयेकर यांच्या वारसांची मालक म्हणून नोंद झालेली आहे.

**२२.** सर्वे क्र. १३७/२ ही गणपती आप्पाजी देसाई यांच्या मालकीची होती. तानूबाई देसाई त्याची पत्नी होती. बाबासाहेब बचाराम देसाई हा तानूबाईचा वारस आहे. गणपती देसाई हे मराठा समाजाचे आणि नरहर जोशी हे ब्राम्हण समाजाचे होते. मला ते एकमेकांचे नातेवाईक असल्याचे माहिती नाही. गट क्र. ३१५ व ३१६ चे वेगवेगळे सरकारी नकाशे आहेत.

**२३.** माझ्याकडे सर्वे क्र. १३७/१ व १३७/२ बाबत देसाई आणि जोशी कुटुंबात वाद असल्याबाबतची कागदपत्रे नाहीत. शंकर देसाई याने दि. ०४.०४.१९६० रोजी नरहर जोशी

याच्याकडून सर्वे क्र. १३७/१ व १३७/२ ची खरेदी केली आहे. त्याबाबत कृष्णा व आण्णा मयेकर यांनी मान्यतापत्र दिलेले असून त्यावरती स्वाक्ष–या केलेल्या आहेत. मला कृष्णा व आण्णा मयेकर कोणत्या वर्षी मयत झाले याची माहिती नाही. दि. ०४.०४.१९६० रोजी खरेदी व मान्यतपत्राचे दोन दस्त तयार करण्यात आले होते. विक्रीपत्राचा दस्त लुकतुके यांनी करुन दिला होता.

**२४**. नरहरी जोशी यांनी शंकर बापू देसाई याला कोणताही विक्रीपत्राचा दस्त करुन दिला नव्हता. आता मला दाखविलेल्या नि. क्र. १२७ वरील मान्यतापत्रामध्ये आण्णाप्पा नागोजी मयेकर याचे नाव व स्वाक्षरी नाही. नि. क्र. १२७ वरील मान्यतापत्रामुळे कृष्णा मयेकर याचे दावा मिळकतींच्या सातबारा उता–यामधून नाव कमी झाले नाही. मान्यतापत्रानंतर आण्णाप्पा मयेकर याचे नाव देखील दावा मिळकतींच्या सातबारा उता–यामधून कमी झाले नव्हते.

**२५**. नि. क्र. १२६ व १२७ वरील दस्त करण्यापूर्वी कूळ कायद्या अंतर्गत जिल्हाधिका–यांची परवानगी घेतलेली नाही. शंकर बापू देसाई याने दावा मिळकतींबाबत कूळ वहिवाटीचे प्रकरण चालविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दत्तात्रय लुकतुके याचे नाव कमी होऊन नरहर विष्णू जोशी याचे नाव दावा मिळकतीला आले होते. शंकर देसाई याने नरहरी जोशी याचे नाव कमी करण्याबाबत कोणतीही कारवाई केली नाही.

**२६**. मी या दाव्यात प्रतिवादींनी दाखल केलेली कागदपत्रे पाहिली आहेत. शंकर बापू देसाई याने सर्वे क्र. १३७/१ (गट क्र. ३१६) च्या मिळकतीसाठी शिवराम कृष्णा मयेकर, आण्णाप्पा नागोजी मयेकर व त्याच्या मुलांच्या विरोधात नि.दि.दावा क्र. ५०/१९८४ दाखल केला होता. त्या दाव्याचा दि. २६.०१.१९८५ रोजी हुकूमनामा झालेला आहे, त्या हुकूमनाम्याला शंकर देसाई व वादींनी वरील न्यायालयात आव्हानित केलेले नाही. साक्षीदाराला सदर न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत उलट तपासादरम्यान दाखविल्यामुळे त्याला **नि. क्र. ११६** देण्यात येतो.

**२७**. हे म्हणणे खरे नाही की, नि.दि.दावा क्र. ५०/१९८४ च्या न्यायनिर्णया प्रमाणे शंकर देसाई अथवा वादींचा दावा मिळकतींवरती कोणताही ताबा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा

मिळकतीबाबतचा कूळ कायद्या अंतर्गत जमीन मालक व कूळ आण्णा व कृष्णा मयेकर यांच्यातील प्रकरणाचा दि. ०३.०१.१९८४ रोजी निकाल झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या आदेशाप्रमाणे आण्णा व कृष्णा मयेकर यांच्याकडून खरेदी रक्कम घेऊन कलम ३२–ग चे प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

**प्रश्न** – कृष्णा व आण्णाप्पा मयेकर यांची दावा मिळकतींना कशाप्रकारे नावे आली याची तुम्ही चौकशी केली आहे काय ?

**उत्तर** – गट क्र. ३१५ व ३१६ च्या कूळकोष्टकी १/२ हिस्यासाठी असणारी कृष्णा व आण्णाप्पा यांची नावे भोगवटदार सदरी आली आहेत.

**२८**. शंकर देसाई उर्वरित १/२ हिस्याचा मालक असल्यामुळे त्याने किंवा त्याच्या वारसांनी दावा मिळकतींच्या कृष्णा व आण्णाप्पा यांच्या नावे झालेल्या नोंदी कूळकायद्या अंतर्गत कूळ न्यायाधिकरणाकडे आव्हानित केल्या नाहीत.

**प्रश्न** – वादींना कृष्णा व आण्णाप्पा मयेकर यांच्या कुटुंबाच्या नावे असलेल्या १/२ हिस्याबाबत काही तक्रार आहे काय ?

**उत्तर** – वादींना त्यांचा हिस्सा तुटक करुन मिळाल्यास कोणतीही तक्रार नाही.

**२९**. मी दावा मिळकती पाहिलेल्या आहेत. गट क्र. ३१५ च्या पुर्वेला आप्पा कुंभार याची जमीन, पश्चिमेला विठ्ठल पाटील याची जमीन, साक्षीदार पुन्हा सांगतो पश्चिमेला गट क्र. ३१६ ची जमीन, दक्षिणेला सत्तू बुरुड याची जमीन आणि उत्तरेकडील बाजू मला सांगता येणार नाही. गट क्र. ३१६ च्या पुर्वेला गट क्र. ३१५ ची जमीन, पश्चिमेला विठ्ठल पाटील याची जमीन, दक्षिणेला सत्तू बुरुड याची जमीन आणि उत्तरेकडील बाजू मला सांगता येणार नाही.

**३०**. दोन्ही दावा मिळकतींमध्ये मागील वीस वर्षांपासून आज रोजी पर्यंत ऊसाचे पिक आहे. त्यामधील ऊस वादी क्र. १ च्या नावावर कारखान्याला जातो. मागील वीस वर्षांपासून दरवर्षी साधारणपणे १० ते १२ टन ऊस वादी क्र. १ च्या नावे कारखान्याला गेला आहे. मला वादी क्र. १ चे दावा मिळकतीच्या सातबारा उता–याला नाव नसल्यामुळे तिच्या नावे कारखान्याला गेलेल्या ऊसाच्या पावत्या दाखल करता येणार नाही. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ३ ते ९ यांची वहिवाट आहे.

**३१**. आम्ही नि.दि.दावा ५३/१९७३ च्या आदेशाप्रमाणे मयत शंकर देसाई किंवा वादींच्या नावाची सातबारा पत्रकी नोंद होण्यासाठी सन १९७६ साली तलाठयाकडे अर्ज केला होता, तलाठयांनी नोंद केली नाही. त्या विरोधात सन १९७७ साली मंडळ अधिका–यांकडे तक्रार करुन देखील त्यांनी नोंद घेतली नव्हती. वादींनी त्याबाबत वरिष्ठ महसूल विभागाकडे कोणताही अर्ज केला नाही.

**३२**. मी नि.दि.दावा ५३/१९७३ चा दिनांक ०६.१२.१९७५ रोजी न्यायनिर्णय झाल्याची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. मला दावा मिळकतीच्या सातबारा सदरी प्रतिवादी क्र. १० च्या नावाची केव्हा व कशी नोंद झाली याबाबत सांगता येणार नाही. वादींनी त्याचे नाव चुकीचे नमूद झाल्याबाबत महसूल विभागाकडे तक्रार अर्ज केलेला नाही. वादी व प्रतिवादींचा प्रथमतः सन १९७० साली दावा मिळकतीबाबत वाद झाला होता. तो वाद शंकर देसाई याला दावा मिळकतींच्या दक्षिणेकडील बाजू तुटक करुन पाहिजे असल्याबाबत झाला होता. सदरचा वाद वादी व प्रतिवादींमध्ये सामोपचाराने मिटला होता.

**३३**. हे म्हणणे खरे नाही की, वादींचा प्रतिवादी क्र. ३ ते ९ सोबत दावा मिळकती बाबत कोणताही वाद झालेला नाही. दावा मिळकतींवरील प्रतिवादी क्र. १ व २ यांची नावे कमी करण्यासाठी वादींनी कोणतेही महसूल अपिल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतींशी मयत शंकर देसाई अथवा वादींचा कोणताही संबंध नाही.

**३४**. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३१६ मधील जमिनीशी प्रतिवादी क्र. १, २ व १० यांचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, दत्तात्रय लुकतुके यांचा दावा मिळकतींशी कोणताही संबंध नाही. लुकतुके आजरा येथे वकिली व्यवसाय करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, दत्तात्रय लुकतुके याने अनाधिकाराने करुन दिलेल्या पोकळ विक्री दस्तावरुन वादींनी सदर दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मूळ वादी न्यायालयासमक्ष आल्यास सत्य परिस्थिती उघड होईल यामुळे मी कोणतेही अधिकार नसताना खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed
by RAVI
PANDURANG
THORE
Date: 2024.07.24
11:23:45 +0530

(आर. पी. थोरे)

दिनांक – २३.०७.२०२४. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.